**<u>जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अकोला यांचेकडून प्राप्त झालेल्या अकोला जिल्हयातील १५ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. ०३.१०.२०२४ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दुपारी ३.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त</u>**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी खनिकर्म विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडून अकोला जिल्हयातील १५ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०३.१०.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ मुंबई यांनी आदेश क्र. E-156 of 2024 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-240916-FTS-0002 दि. १६.०९.२०२४ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री अजित कुंभार, जिल्हादंडाधिकारी, अकोला | — अध्यक्ष |
| २. श्री. संजय दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती | — सदस्य |
| ३. श्री महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अकोला | — संयोजक |

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. ०३.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०३.१०.२०२४ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी मा. श्री अजित कुंभार यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम श्री. महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अकोला यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अकोला जिल्हयातील १५ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अकोला यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, ३रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
३. उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा चौक, नेहरू पार्क जवळ, अकोला.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, जिल्हा परिषद, अकोला, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.
५. जिल्हयातील संबंधीत उपविभागीय कार्यालये, संबंधीत तहसील कार्यालये व संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, जि. अकोला.

श्री. म.दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी अकोला आणि संयोजक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी डॉ. आशिष शुक्ला, एन्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा.लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री. म.दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, अकोला यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री रोशन महादेव कुंभकर, गाव हाता, ता. बाळापूर, जि. अकोला यांनी विचारणा केली की, या सुनावणी मध्ये हाता ता. बाळापूर रेतीघाटाबाबत माहिती देण्यात आलेली नाही. करीता हाता, ता. बाळापूर, रेती घाटाबाबत माहिती देण्यात यावी.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, या सुनावणीमधे हाता, ता. बाळापूर या रेतीघाटाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे हाता, ता. बाळापूर घाटाबाबत माहिती देण्यात आलेली नाही.

श्री विजय तायडे, मलकापूर जि. अकोला यांनी विचारणा केली की, रेतीघाटापासून रेती वाहतुक करण्याकरीता शासनातर्फे देण्यात आलेला रस्ता पावसाळयात बंद असतो. याबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहे.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, रेतीघाटापासून रेती वाहतुक करण्याकरीता शासनातर्फे देण्यात आलेला रस्त्यावरून रेती वाहतुक करणे अपेक्षीत आहे. याबाबत काही अडचण आल्यास सोडविण्यात येईल.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (महेश भिवापुरकर) | ( सं. दे. पाटील ) | (अजित कुमार) |
| संयोजक | सदस्य | अध्यक्ष लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | जिल्हादंडाधिकारी, अकोला |
| अकोला | अमरावती | |